K. S. Wani Memorial Trust

# NEWS LETTER

Editorial Committee :
Prof. Dr. Shobha Shinde (Chief Editor)
Ms. Vaishali Songire (Asst. Editor) &
Prof. Mr. Prasad Puranik (Co-Editor)

Volume No.26 / July – September 2024 / K. S. Wani Memorial Trust Reg. No.E352

## Printing Institute News




### लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त स्टुडंट्स इंडक्शन प्रोग्रामचे आयोजन

१ ऑगस्ट लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना संस्थेची ओळख व्हावी या हेतूने स्टुडन्ट इंडक्शन प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी धुळे शहरातील बोस्टन कॉम्प्युटर्स या ख्यातनाम संस्थेचे संचालक माननीय श्री. विष्णुकांत फापट यांच्या हस्ते लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला व प्रथम वर्षाच्या वर्गांचे उद्घाटन झाल्याचे घोषित करण्यात आले.  यावेळी श्री विष्णुकांत फापट यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याच कार्यक्रमात संस्थेचे आर्टिस्ट श्री. मनोज गांधलीकर यांनी ग्राफिक डिझाईनिंग या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. मिलिंद दीक्षित यांनी केले.




स्टुडंट्स इंडक्शन प्रोग्राम कार्यक्रमात मान्यवरांसमवेत विद्यार्थी व कर्मचारी वृंद



### स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

१५ ऑगस्ट २०२४ रोजी आपल्या देशाने ७८ वा स्वातंत्र्य दिन साजरा केला. आपल्या संस्थेत देखील संस्थेचे विश्वस्त माननीय श्री श्रीपालजी मुणोत यांच्या हस्ते ध्वजावरोहण करून स्वातंत्र्य संग्रामात आपल्या प्राणांची आहुती दिलेल्या हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त माननीय श्री जितेंद्र सोनगिरे , व्यवस्थापक श्री  गिरीश केले तसेच पदवीका अभ्यासक्रमाचे विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन श्री. मिलिंद दिक्षित यांनी केले.

प्रेरणा द्या ! यशस्वी व्हा !

यशोगाथा

महेश गुलाब माळी

शैक्षणिक वर्ष 2017-18



## विद्यार्थ्यांची यशोगाथा

मी महेश गुलाब माळी मु. पो. धमाणे, ता. जि. धुळे माझे वडील अल्पभूधारक शेतकरी, स्वतःची शेती करता करता गावातील शेती खंडून करण्याचा त्यांचा व्यवसाय, एवढे करून देखील निसर्गाची साथ नसल्याने शेतीच्या उत्पन्नात भागत नसे म्हणून माझी आई देखील गावात दुसऱ्याच्या शेतात मजुरी करण्यासाठी जात असे.

आम्ही दोन भाऊ दोघांनाही शिकवण्याची जिद्द आई-वडिलांनी मनाशी बाळगली, शिक्षणासाठी बराच खर्च असल्याने माझ्या वडिलांनी धुळे येथे बागेत काम करण्याचा व्यवसाय सुरू केला, मोठमोठ्या बंगल्यात त्यांना काम मिळू लागले, असेच एकदा कृषी अधिकारी यांचे कडे काम करत असताना त्यांनी वडिलांची चौकशी केली मुलं काय करतात? म्हणून विचारले व त्यांनीच मोठ्या मुलाला बारावी उत्तीर्ण झाल्याबरोबर मुद्रण तंत्रकला प्रशिक्षण द्यावे असे सुचविले. तुम्हाला मुलाला नोकरीला लावणे खूप गरजेचे आहे व हा कोर्स केल्यानंतर तुमचा मुलगा एक दिवसही घरी बसणार नाही असे सांगितले. त्यांचे बोलणे माझ्या वडिलांनी मनावर घेतले व लगेचच संस्थेत येऊन अभ्यासक्रमाची माहिती करून घेतली. दुसऱ्या दिवशी ते मला घेऊन संस्थेच्या वर्कशॉप मध्ये सरांना भेटले आम्ही मुद्रण क्षेत्राची पूर्ण माहिती करून घेतली मला या क्षेत्राविषयी जिज्ञासा निर्माण झाली. मी या क्षेत्रात करिअर करण्याचे ठरविले.मी प्रथम वर्षात प्रवेश घेतला, मला धुळ्यात रूम करणे शक्य नव्हते म्हणून मी रोज धमाणे ते धुळे असे सुमारे २२ किलोमीटर अंतर सायकलवर अप-डाऊन करत असे.

माझी प्रथम सत्राची फी भरून वडिलांनी उत्साहात प्रवेश घेतला परंतु दुसऱ्या सत्रापासून फी भरण्याची वडिलांची स्थिती नव्हती परंतु वडिलांनी यातून मार्ग काढण्याचे ठरविले. आपल्या संस्थेच्या रेऊ वाणी विज्ञान विहार या प्रकल्पाच्या बॉटेनिकल गार्डन मध्ये माळी काम करणाऱ्या व्यक्तीची गरज असल्याचे मला समजले, माझ्या वडिलांना ते काम मिळाले या माध्यमातून माझा फी चा प्रश्न सुटला , वडील दर महिन्यास तीन हजार रुपये फीज जमा करून उर्वरित रक्कम घर खर्चासाठी नेत असत . मी २०१७ साली पदविका अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला मला सुरुवातीस क्रिश पॅकेजिंग या समूहात नोकरी मिळाली. त्यावेळी माझे वेतन फक्त दहा हजार रुपये होते. त्यानंतर मला पी पी एल हुतामाकी या बहुराष्ट्रीय कंपनीतून जॉब ची ऑफर आली आणि ती मी स्वीकारली. कंपनीने माझे कामातील कौशल्य पाहून मला दुबई येथे सुपरवायझर या पदावर नियुक्त केले या ठिकाणी मला खूप अनुभव आला व शिकायला मिळाले. सद्या मी दुबईला प्रोडक्शन सुपरवायझर या पदावर गेल्या तीन वर्षांपासून कार्यरत आहे , मी आता सुमारे एक लाख दहा हजार इतक्या वेतनावर काम करत आहे. तीन वर्षात मिळालेल्या पैशातून मी माझ्या गावात चार रूमचे घर बांधले असून मागच्या वर्षी माझा विवाह देखील झाला. इतक्या कमी वयात मी प्रगतीचे अनेक टप्पे पूर्ण करू शकलो ते फक्त संस्थेमुळे. संस्थेत मला मिळालेले मार्गदर्शन मी कधीही विसरू शकत नाही येथील सर्व शिक्षक वृंद व पदाधिकारी विशिष्ट अशा ध्येयाने कार्यरत आहेत. अण्णासाहेब डॉ. जगन्नाथ वाणी यांनी या संस्थेची निर्मिती करून माझ्यासारख्या अनेक होतकरू युवकांना मदतीचा हात दिला आहे मी संस्थेचा शतशः आभारी आहे.





## महावाचन उत्सव २०२४ ग्रंथ प्रदर्शनात सहभाग

दिनांक ३० सप्टेंबर २०२४ रोजी धुळे जिल्हा परिषदेच्या समग्र शिक्षा शिक्षण विभागामार्फत जे आर सिटी हायस्कूल सभा मंडपात संपन्न होणाऱ्या महावाचन उत्सवानिमित्त आपल्या संस्थेतर्फे ग्रंथ प्रदर्शनात सहभाग नोंदविण्यात आला. संस्थेचे विश्वस्त माननीय श्री. जितेंद्र सोनगिरी यांच्या मार्गदर्शनाने उपयुक्त ग्रंथ व आमची श्रीवाणी चे निवडक अंक मांडण्यात आले होते. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विशाल नरवाडे यांनी आपल्या स्टॉलला भेट देऊन ग्रंथांची पाहणी करून संस्थेविषयी माहिती जाणून घेतली. यावेळी ग्रंथपाल श्री. मिलिंद दीक्षित यांनी ग्रंथ भेट देऊन त्यांचे स्वागत केले, शासनातर्फे आपल्या संस्थेला सहभागासाठी प्रमाणपत्र देण्यात आले. सदर ग्रंथ प्रदर्शनासाठी प्राध्यापक प्रसाद पुराणिक प्राध्यापक निलेश पाटील श्री सुनील देसलेव व श्री अनिल पाटील आदींनी सहकार्य केले.




ग्रंथभेट स्वीकारतांना जि.प. मुख्यकार्यकारी अधिकारी श्री. विशाल नरवाडे


## वैशाली पाटीलचे विद्यार्थ्यांना सायबर क्राईमबाबत मार्गदर्शन




एस. एस.व्ही.पी. एस. इंजीनियरिंग कॉलेज व देवपूर पश्चिम पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन युवकांमध्ये ऑनलाईन व्यवहार करताना होणारे गैरप्रकार व फसवणुकीचे गुन्हे कमी करण्याचे हेतूने विद्यार्थ्यांमध्ये सायबर क्राईमविषयी जनजागृती करण्यासाठी सेमिनार स्वरूपात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात एस. एस. वी. पी. एस. इंजिनिअरिंग कॉलेजची विद्यार्थिनी कुमारी वैशाली पाटील हिने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये ऑनलाईन व्यवहार करताना घ्यावयाची काळजी व ऑनलाईन व्यवहाराबाबत असलेली भीती व गैरसमजुती कमी झाल्या.

## संस्थेच्या एम.आय.डी.सी. युनिटमध्ये श्री गणेशोत्सव उत्साहात साजरा

दरवर्षी संस्थेच्या एमआयडीसी येथील उत्पादन विभागात सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जातो. यावर्षी देखील श्री गणरायाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करून हा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. प्रथेप्रमाणे कर्मचारी श्री संभाजी मराठे यांनी सपत्नीक श्री सत्यनारायणाची महापूजा केली. अतिशय भक्तीमय वातावरणात सात दिवसांचा गणेशोत्सव साजरा करण्यात आला.



पूजेत बसलेले यजमान सौ.व श्री. संभाजी मराठे

# स्व. डॉ.जगन्नाथ वाणी यांच्या जयंतीनिमित्त 'म्हणजे गझल' कार्यक्रम संपन्न

का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. डॉ. जगन्नाथ वाणी यांचा जन्मदिवस १० सप्टेंबर यानिमित्ताने धुळेकर मराठी रसिक प्रेक्षकांना गप्पांमधून गझलचे अंतरंग उलगडून दाखवणाऱ्या एका अविस्मरणीय 'म्हणजे गझल' या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या प्रा.रघुनाथ केले सभागृहात आयोजित करण्यात आला होता.

यावेळी व्यासपीठावर का.स.वाणी स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष सीए शशिकांत धामणे, सचिव प्रा. डॉ. शोभा शिंदे, संचालक प्रा. डॉ. वंदना महाजन गझल गायक डॉ. शेख इक्बाल मिन्ने, डॉ. आशिष पानट, डॉ. रणधीर डॉ. मानसी पानट आदी मान्यवर उपस्थित होते प्रस्ताविक व स्वागत प्रा. डॉ. शोभा शिंदे यांनी केले मान्यवर कलाकारांचा ग्रंथ भेट व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी स्वर्गीय डॉ. जगन्नाथ वाणी यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाल्यार्पण करण्यात आले .

सीए श्री. शशिकांत धामणे यांनी डॉ. जगन्नाथ वाणी यांच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय करून दिला समाजसेवी उदात्त कार्यामुळे डॉ. वाणीना कॅनडा सरकारने ऑर्डर ऑफ कॅनडा हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन सन्मानित केले. त्यांनी आपल्या आयुष्यात चांगले मित्र जोडले महाराष्ट्रातील गीत गायक, कलाकार यांना अमेरिकेत आमंत्रित करून त्यांचा सन्मान केला सामाजिक संस्थांना भरभरून आर्थिक मदत केली. या शब्दात त्यांनी डॉ. वाणी यांच्या आठवणींना उजाळा दिला. डॉ. मिन्ने यांनी आपल्या अदाकारीत गझल विषयी सोपी व्याख्या व संकल्पना सांगून तिच्या गायनातून श्रोत्यांची मने जिंकले. डॉ. आशिष पानट, डॉ.रणधीर, डॉ.मानसि पानट यांनी आपल्या शब्दकलेतून शब्द चित्रातून उत्कृष्ट गझल चे सादरीकरण करून सगळ्यांना मंत्रमुग्ध केले. गझल कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुषमा दाते यांनी केले कार्यक्रमास विश्वस्त प्रा.डॉ. न. म.जैन विश्वस्त मा.श्री जितेंद्र सोनगिरे, प्रशासन प्रमुख मा. सौ वैशाली सोनगिरे, शहरातील प्रतिष्ठित डॉक्टर, विविध क्षेत्रातील नामवंत नागरिक, केले परिवारातील सदस्य व मित्र परिवार, संस्थेचा कर्मचारी वृंद आदी उपस्थित होते. डॉ. दिपाली महाजन यांनी आभार प्रदर्शन केले.




मनोगत व्यक्त करतांना सीए श्री. शशिकांत धामणे, उपस्थित प्रा. डॉ. शोभा शिंदे, प्रा. डॉ. वंदना महाजन आदी मान्यवर कलावंत




सुश्राव्य गझल सादर करतांना डॉ. रणधीर, डॉ.मानसि पानट व मान्यवर कलावंत

# रेऊ वाणी विज्ञान विहार

## "विज्ञान, अभ्यास आणि बरेच काही" या विषयावर मार्गदर्शन

रेऊ आणि विज्ञान विहार संस्थेतर्फे संस्थेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी डॉक्टर आशिष पानट यांचे "विज्ञान, अभ्यास आणि बरेच काही" या विषयावर भाषण आयोजित करण्यात आले होते. त्यात डॉक्टर पानट यांनी निसर्गातील लहान मोठ्या गोष्टींमध्ये त्याचप्रमाणे रोजच्या जीवनातील विविध गोष्टींमध्ये असलेले विज्ञान आणि मानवी शरीरातील असलेले विज्ञान यांची सांगड घालून दोघांमधली एकरुपता दाखवून दिली. त्यामुळे अभ्यासक्रमातील विज्ञानाव्यतिरिक्त इतर गोष्टींमध्ये दडलेले विज्ञान विद्यार्थ्यांना समजून घेता आले आणि त्यामुळे त्यांच्याही मनात विज्ञानाविषयी कुतूहल जागरूक होण्यास खूप मदत होईल असे मत डॉक्टर पानट यांनी व्यक्त केले. त्याचप्रमाणे अभ्यासाबद्दल बोलताना डॉक्टर पानट यांनी विद्यार्थ्यांना काही सोप्या टिप्स दिल्या आणि घोकंपट्टी म्हणजे अभ्यास नाही तर समजून उमजून केलेले वाचन, चिंतन आणि मनन म्हणजे अभ्यास ही गोष्ट विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवली गेली. त्याचप्रमाणे अभ्यास करताना शारीरिक आणि मानसिक आरोग्य सांभाळण्यासाठी काय केले पाहिजे याबद्दलही डॉक्टर पानट यांनी विवेचन केले. या कार्यक्रमानिमित्त उपस्थित असलेल्या पालकांशी संवाद साधत मुलांच्या अभ्यासामध्ये पालक कशी मदत करू शकतात याबद्दल उहापोह केला.

## प्रयोग वर्गाचा उद्घाटन कार्यक्रम

रेऊ वाणी विज्ञान विहारातील प्रयोग वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी दर महिन्याला एक याप्रमाणे दरवर्षी १२ विषय तज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन आयोजित केले जाते विद्यार्थ्यांना चालू घडामोडी वेगवेगळ्या टेक्नॉलॉजी स्पेस सायन्स, वैद्यकीय क्षेत्रातील विविध वैज्ञानिक गोष्टी समजावून सांगितल्या या मागचा मुख्य उद्देश असतो. यावर्षी प्रयोग वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी चे पहिले मार्गदर्शन व उद्घाटन सोहळा पार पडला त्यात उद्घाटक म्हणून माननीय डॉ. आशिष पानट प्रमुख अतिथी कांतीलाल पाटील व डॉक्टर मानसी पानट हे मान्यवर उपस्थित होते .




उद्घाटन करतांना मान्यवर

## बक्षीस वाटप

रेऊ वाणी विज्ञान विहारात दरवर्षी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध स्पर्धा चे आयोजन होते. त्याच बरोबर विविध क्षेत्रात प्राविण्य मिळवल्याबद्दल किंवा विविध स्पर्धा परीक्षेत प्राविण्य मिळवल्याबद्दल विद्यार्थ्यांचा बक्षीस वाटप करून गौरव करण्यात येतो . या कार्यक्रमातच प्रवेश परीक्षेत प्रथम तीन विद्यार्थ्यांना बक्षीस वाटपाचा मान्यवरांच्या हस्ते कार्यक्रम करण्यात आला.



## मा. कांतीलाल पाटील यांचे मार्गदर्शन

नेव्ही इंजिनियर मा. कांतीलाल पाटील यांनी नवदलात करीयर करण्यासाठी आवश्यक माहिती सांगून जगातील सात आश्चर्यांपैकी एक असणाऱ्या पनामा कालव्याचा व्हिडियो दाखवून सविस्तर माहिती सागितली.आधुनिक अभियांत्रिकी शास्त्रन्याचा सर्वोत्तकृष्ट नमूना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पनामा कालव्याचे तेथील कार्य व त्यातील विज्ञान समजू घेण्यासारखे आहे तेथील भौगोलिक वातावरण, कालव्या मुळे पनामाची सुधारलेली अर्थव्यवस्था याबद्दल माहिती दिली व विद्यार्थ्यांना अशा विविधक्षेत्रांत काम करण्यासाठी लागणारे विज्ञान बाल वयातच नीट समजून घेतलेतर त्याचे भविष्य उज्वल राहील यात शंका नाही असे सांगत मार्गदर्शनाचा समारोप केला .त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते प्रवेश परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करण्यात आले.



पनामा कालव्याचे विहंगम दृष्य

## शाळू मातीचा गणपती मेकिंग कार्यशाळा

दरवर्षीप्रमाणे पर्यावरण पूरक समिती अंतर्गत १ सप्टेंबर २०२४ रोजी रेऊ वाणी विज्ञान विहारा तर्फे गणपती मेकिंग कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती. त्यात विद्यार्थ्यांना शाळू मातीचा गणपती कसा बनवावा व त्याचे रंगकाम कसे करावे याबद्दल मा.दिनेश निकम यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत चाळीस विद्यार्थी सहभागी झाले होते. सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी शाळू मातीचे अनेक सुरेख गणपती तयार केले प्लास्टर ऑफ पॅरिसचा गणपती न बसवता मुलांनी स्वतः केलेले गणपती आपल्या घरी स्थापन केले. कार्यशाळेत गणपती साकारताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद काही निराळाच असतो.



मार्गदर्शन करतांना श्री. दिनेश निकम व सहभागी विद्यार्थी

# बालनेत्र सुरक्षा प्रकल्प

## शारदा नेत्रालय प्रकल्पांतर्गत झालेल्या नेत्रशस्त्रक्रिया

जुलै ते सप्टेंबर २०२४ या दरम्यान अमळनेर तालुक्यातील ५० व धुळे तालुक्यातील ६ शाळांमध्ये एकूण १५८१६ विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली तपासणी दरम्यान ४५५ विद्यार्थ्यांना शारदा नेत्रालय येथे रेफर करण्यात आले. ४० विद्यार्थ्यांना तिरळेपणा असल्याचे निदर्शनास आले तीरळेपणा असणा-या २ विद्यार्थ्यांची मोफत नेत्रशस्त्रक्रिया करण्यात आली.


शस्त्रक्रियेपूर्वी


शस्त्रक्रियेनंतर


शस्त्रक्रियेपूर्वी



शस्त्रक्रियेनंतर

### तपासणी अहवाल तक्ता

| | जुलै ते सप्टेंबर २०२४ पर्यंत | ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत |
|---|---|---|
| Screened | १५८१६ | ११६६०३ |
| Spect (School Camp) | ० | १६७ |
| Refer (School) | ४५५ | ५००४ |
| Visited | १७ | ६२० |
| Surg. Suggested | २ | ५६ |
| Surg. done | २ | ३८ |
| G.P. given (S.N.) | ९ | ३२२ |
| Higher Centre | २ | १५ |
| Patch | १ | ३५ |
| Cornea / Retina | ० | ११ |
| Follow Up / medicine given | १ | ११९ |

## सेट अँथनी स्कूलमध्ये विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी

शहरातील सेट अँथोनी स्कूलमध्ये का.स. वाणी स्मृती प्रतिष्ठानतर्फे २००० विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली. सध्याच्या युगात अनेक मुले मोबाईलच्या आहारी गेल्यामुळे विद्यार्थ्यांना डोळ्यांचे आजार उद्भवत आहेत. मोबाईलमुळे विद्यार्थ्यांचे डोळे तीरळे होत आहेत, नजर कमी होत आहे तर काहींची दृष्टी सुद्धा गेली असल्याने हे शिबिर घेण्यात आले आहे. यावेळी का.स. वाणी स्मृती प्रतिष्ठान संस्थेचे प्रशासन प्रमुख वैशाली सोनगिरे, सेट अँथोनी शाळेचे प्रा. फादर रिलेन्स रोड्रिक्स, डॉ.दिपाली महाजन, जितेंद्र पाटील, दिपाली मोरे, हर्षदा सोनार व ललित माळी यांच्यासह सर्व मान्यवर यावेळी उपस्थित होते.




छाया : पुण्य

**पुण्य नगरी**

### सेंट अँथनी स्कूलमध्ये विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी


**धुळे :** शहरातील सेंट अँथनी स्कूलमध्ये का.स. वाणी स्मृती प्रतिष्ठानतर्फे २ हजार विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली. सध्याच्या युगात अनेक मुले मोबाईलच्या आहारी गेल्यामुळे विद्यार्थ्यांना डोळ्यांचे आजार उद्भवत आहेत. मोबाईलमुळे विद्यार्थ्यांचे डोळे तिरळे होणे, नजर कमी होणे तर काहींची दृष्टी सुद्धा गेली असल्याने हे शिबिर घेण्यात आले आहे.यावेळी का.स. वाणी संस्थेचे प्रशासन प्रमुख वैशाली सोनगिरे, सेंट अँथनी शाळेचे प्राचार्य फादर विल्सन रोड्रिक्स, डॉ.दीपाली महाजन, जितेंद्र पाटील, दीप मोरे, हर्षदा सोनार, ललित माळी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन संस्था पुणे - उपक्रम

## ‘’सा’’ संस्थेमार्फत 'स्किझोफ्रेनिया' तर्फे केअरगिव्हर्स ‘डे’ साजरा

डॉ. जगन्नाथ वाणी यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन (सा) या संस्थेतर्फे नुकताच केअरगिव्हर्स ‘डे’ साजरा करण्यात आला. यावेळी स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन तर्फे 'माझे पालक' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण देशातून या स्पर्धेला प्रतिसाद मिळाला. आर्थिक दृष्ट्या कमकुवत मानसिक आजारी व्यक्तीच्या दहा पालकांना संस्थेकडून आर्थिक मदत करण्यात आली यावेळी 'भारतीय कुटुंब आणि मानसिक आजारी व्यक्ती: ताणतणाव , काळजी आणि यातून बाहेर पडण्याचा मार्ग' या विषयावर वेबिनार आयोजित करण्यात आले होते.

यामध्ये कर्नाटकच्या राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरणाचे सदस्य अनंत अगस्त्य ,केंद्रीय मानसिक आरोग्य प्राधिकरणाच्या सदस्य ममता डी , आशा संस्थेच्या अध्यक्षा रत्ना छिब्बर सेवानिवृत्त नौदल कमांडर अर्णब दास , अमन बतीश, आर.पी.एस. कपूर यांनी या चर्चासत्रात सहभाग नोंदविला. मानसिक आजारी व्यक्तीला सांभाळतांना असाहाय्यता ताणतणाव काळजी कमी करण्यासाठीचा सामाजिक दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे शासनाने यासंदर्भात ठोस भूमिका घेतली तर यातून निश्चित काहीतरी मार्ग निघू शकेल असा विश्वास तज्ज्ञांनी व्यक्त केला. आरती पंडित यांनी सूत्रसंचालन केले, रवींद्रनाथ चंद्रन यांनी चर्चा सत्राचे समनव्यक म्हणून भूमिका बजावली अभय केले यांनी 'केअरगिव्हर्स' डे चे महत्व विशद केले तर उज्वल केले यांनी आभार मानले.




केअरगिव्हर्स ‘डे’ कार्यक्रमात सहभागी मान्यवर

## चेन्नई येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत सा प्रतिनिधी सहभागी

२५ जुलै रोजी मानसिक आरोग्य, बेघर आणि सर्वसमावेशक विकास या विषयावरील चौथी आंतरराष्ट्रीय परिषद बनियन, चेन्नई या संस्थेने आयोजित केली होती . या परिषदेत स्किझोफेनिया अवेअरनेस असोसिएशन, पुणे या संस्थेच्या उपाध्यक्षा व 'होम अगेन' या प्रकल्पाच्या संचालक डॉ. प्रगती कौशल या परिषदेला उपस्थित होत्या. आंतरराष्ट्रीय परिषदेला सा संस्थेचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी सहभाग नोंदवला या परिषदेची थीम "आशा, घर आणि आरोग्य" अशी होती.



आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी संस्थेचे प्रतिनिधी

**शारदा नेत्रालयाने १०,०००+ मोतीबिंदू शस्त्रक्रियेचा उच्चांक**

१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या एका वर्षामध्ये शारदा नेत्रालयाने १०,०००+ मोतीबिंदू शस्त्रक्रियेचा उच्चअंकी टप्पा गाठला त्याबद्दल शारदा नेत्रालय येथील कर्मचाऱ्यांचे विश्वस्तांकडून कौतुक करण्यात आले. शारदा नेत्रालयाच्या विश्वस्तांनी डॉक्टर व सर्व कर्मचाऱ्यांसोबत साजरा केली.





शारदा नेत्रालयाने १०,०००+ मोतीबिंदू शस्त्रक्रियेचा उच्चांक साजरा करतांना नेत्रालयाचे कर्मचारी वृंद

## शारदा नेत्रालय OPD रिपोर्ट

| OPD DETAILS | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Period | Paid | Review Fre | Express OPI | Subsidzed | Retina OPD | Paediatric OPD | Total |
| 1st June'24 to 30th Sept | 8960 | 3015 | 528 | 780 | 525 | 84 | ***13892*** |

| OT DETAILS (Surgery Details) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Period | SICS Free | SICS Paid | Phaco | Retina | Other | Paediatric | Total |
| 1st June'24 to 30th Sept | 534 | 296 | 1096 | 45 | 228 | 4 | ***2203*** |


**का. स. वाणी स्मृति प्रतिष्ठान, धुळे**

**विद्यमान विश्वस्तांची यादी**

मा.सी.ए.श्री.शशिकांत धामणे (अध्यक्ष)

मा. प्रा.डॉ. शोभा शिंदे (सचिव)

मा. डॉ.के.बी. पाटील

मा. श्री. श्रीराम जगन्नाथ वाणी

मा. प्रा.डॉ. नटवरलाल जैन

मा. श्री. श्रीपाल मुणोत

मा. श्री. विवेक केले

मा. श्री. जितेंद्र सोनगिरे


**We accept donations from well-wishers**

K.S.Wani Memorial Trust
Current Account No. 48310010006917
IFSC Code IBKL0000483
IDBI Bank, Dhule (Maharashtra)

Reg. No. K.S. Wani Memorial Trust. No. E352/Dhule
FCRA Reg. No. 083820024
PAN No. AAATK9380K


**Contact:** K. S. Wani Memoral Trust,
Unnati Nager Nakane Road Deopur Dhule- 424002
(02562)223654, 9372810477
Email Id: kswmarathi@gmail.com
Please Visit: www.kswtrust.org